# देशी बियाणे वाटप कार्यक्रम

## दिनांक ३१ मार्च २०२५

**पार्श्वभूमी-** डेव्हलपमेंट सपोर्ट टीम पुणे या संस्थेच्या आर्थिक सहकार्याने सोलापूर जिल्ह्याच्या करमाळा तालुक्यातील सालसे या गावामध्ये दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी पारंपारिक बियाणांचे वाटप शेतकऱ्यांना करण्यात आले. एकूण २० शेतकरी यांची निवड करून त्याना हे पारंपारिक बियाणे वाटप करण्यात आले.

**बियाणे वाटप कार्यक्रम -** पोषक अशा पारंपारिक पद्धतीच्या एकूण १५ प्रकारच्या बियानाचे वाटप करण्यात आले. दिवसें-दिवस केमिकल युक्त खतांचा वापर भाजीपाला व अन्नधान्य उत्पादनासाठी केला जातो त्याचे दुष्परिणाम सध्या समाजावर होत आहेत. म्हणून पारंपारिक बियानांकडे व उत्पादनांकडे शेतक-यांचे लक्ष वळवण्यासाठी पारंपारिक बियाणे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मार्केट मध्ये मोठ्या प्रमाणात फळे, पाले-भाज्या विक्रीसाठी येत आहे. गावातील या पाले-भाज्या खरेदी करण्यासाठी महिलांची भरपूर प्रमाणात गर्दी होते त्याचा परिणाम आरोग्यावर होतो. त्यासोबत या भाजीपाल्यासाठी ८ जनाच्या कुटुंबाला महिन्याकाठी ५०० ते ६०० रुपये खर्च होतात सर्व जन शेतकरी असून देखील स्वतःची शेती असून देखील हा आकडा खूप मोठा आहे. त्यामुळेच गावातील लोकांचे आरोग्य निरोगी राहावे व या २० कुटुंबाची आठवडा बाजार या साठी होणारा खर्च कमी व्हावा या साठी डेव्हलपमेंट सपोर्ट टीम पुणे या संस्थेच्या वतीने सालसे या गावामध्ये पारंपारिक पद्धतीचा देशी भाजीपाला बी-बियाणे वाटप दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी अभिनव भारत समाज सेवा मंडळ, सालसे येथे करण्यात आले. गावातील एकूण १० अल्पभूधारक शेतक-यांना पारंपारिक देशी बियाणे वाटप करण्यात आले. सदर बियाणे वाटप कार्यक्रमाला गावचे माजी सरपंच मच्छिंद्र पोळ, प्रगतशील बागायतदार गणेश देवकर, धनंजय सालगुडे अभिनव भारत समाज सेवा मंडळ, सालसे या संस्थेचे अध्यक्ष संतोष राऊत, मुख्य कार्यकारी

अधिकारी विनायक सालगुडे, प्रकल्प व्यवस्थापक शुभम ननवरे तसेच गावातील, वाड्या वस्त्यांवरील शेतकरी युवक उपस्थित होते.




Development Support Team
ग्रामीण शेतकऱ्यांसाठी
शाश्वत उपजीविका विकास कार्यक्रम
अंतर्गत
देशी बियाणे वाटप
Latitude: 18.291837
Longitude: 75.315397
Elevation: 535.25±13 m
Accuracy: 6.1 m
Time: 31-03-2025 09:05
Note: देशी बियाणे वाटप
Powered by NoteCam